जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
4 AUG 2019
तरुण भारत

# वैश्विक भान जपणाऱ्या साहित्यनिर्मितीची गरज

## मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

आज मूल्यभान ठेवून, तटस्थपणे सत्याचा शोध घेणाऱ्या साहित्यिकांची गरज आहे. पुस्तके जशी जगण्याचे भान देतात, तशीच ती लेखकाच्या मनाचा आरसा असतात. मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी आग्रही आणि वैश्विक भान जपणारी साहित्यनिर्मिती होण्याची गरज आहे, असे प्रतिपादन मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागाच्यावतीने आयोजित साहित्य अकादमी आणि मराठवाडा साहित्य परिषदेच्या पुरस्कारप्राप्त साहित्यिकांच्या सत्कार समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांची प्रमुख उपस्थिती होती.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभागाच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात पुरस्कार विजेत्यांसोबत मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. राजन गवस, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे आदी.**

डॉ. देशमुख म्हणाले, लेखकाचे अनुभवविश्व त्याला वैश्विक संवेदनांचा हुंकार बनायला भाग पाडते. हेच मानवी मूल्यभान, वैश्विक जाणिवा साहित्यांमधून प्रतिबिंबित होतात. जागतिकीकरणानंतरची अमानुषता, जगण्यातली विषमता, नव-आर्थिक चातुर्वर्ण्य व्यवस्था, जल, जमीन, जंगल यासंदर्भातील पर्यावरणीय अनास्थेवर प्रहार करतानाच मानवतावादाचा उद्घोष हे साहित्यिक करतात.

पुरस्कार विजेत्या साहित्यिकांमध्ये बालसाहित्यासाठीचा साहित्य अकादमी पुरस्कार विजेते सलीम मुल्ला (जंगल खजिन्याचा शोध-कादंबरी), युवा साहित्य पुरस्कार विजेते सुशीलकुमार शिंदे (शहर आत्महत्या करायचं म्हणतंय-कवितासंग्रह), मराठवाडा साहित्य परिषदेचा बी. रघुनाथ पुरस्कार विजेते किरण गुरव (जुगाड-कादंबरी), परिषदेचाच म. भि. चिटणीस पुरस्कार विजेते दत्ता घोलप (मराठी कादंबरी: आशय आणि आविष्कार- समीक्षाग्रंथ) यांचा मान्यवरांच्या हस्ते शाल, ग्रंथ व स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

# जैवविविधतेच्या संवर्धनाची गरज

## वनसंरक्षक सत्यजित गुजर : शिवाजी विद्यापीठात कार्यक्रम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

जैवविविधतेचे संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. त्यासाठी संशोधक विद्यार्थी व जागरूक नागरिकांची सतर्कता आवश्यक असल्याचे प्रतिपादन सह्याद्री व्याघ्र प्रकल्प संचालक तथा वनसंरक्षक सत्यजित गुजर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागामध्ये आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी विक्रीकर विभागाचे सह. आयुक्त संजय जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती.

गुजर म्हणाले, प्राणीशास्त्र विभागात जैवविविधता, प्राण्यांचे वर्गीकरण, रेशीमशास्त्र, मत्स्यशास्त्र यांच्या अनुषंगाने मोठे काम सुरू आहे. या विषयातील विद्यार्थी



**कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना सह्याद्री व्याघ्र प्रकल्प संचालक वनसंरक्षक सत्यजित गुजर.**

जंगलांचे, प्राण्यांचे प्रामुख्याने, कीटक, उभयचर व इतर प्राण्यांची ओळख नवीन जातींचा शोध, अन्न साखळी जपण्यासाठी मोलाचे योगदान देऊ शकतात. देशात २९६७ वाघांची संख्या असून अन्न साखळीतील महत्त्वाचा घटक आहे. त्यांचे संवर्धन झाले पाहिजे, त्यासाठी नव्या उमेदीचे तरुण संशोधक, निसर्ग मित्र निर्माण झाले पाहिजेत.

याप्रसंगी विक्रीकर सह.आयुक्त जगताप यांनी विद्यार्थ्यांना लोकसेवा आयोगाच्या परीक्षा आणि संधी याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे सदस्य डॉ. ए. डी. जाधव, विभागप्रमुख डॉ. व्ही. एस. मन्ने यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी डॉ. एस. आर. यंकची, डॉ. एम. व्ही. वाळवेकर, डॉ. एस. एम. गायकवाड, डॉ. एन. ए. कांबळे आदी उपस्थित होते.

# वैश्विक भान जपणाऱ्या साहित्याच्या निर्मितीची गरज

## डॉ. लक्ष्मीकांत देशमुख; शिवाजी विद्यापीठात पुरस्कारप्राप्त साहित्यिकांचा सत्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

मानवी मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी आग्रही असणाऱ्या आणि वैश्विक भान जपणाऱ्या साहित्याची निर्मिती होत राहणे आजच्या परिस्थितीत आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक तथा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ मराठी अधिविभागातर्फे साहित्य अकादमी व मराठवाडा साहित्य परिषदेच्या पुरस्कार प्राप्त साहित्यिकांचा सत्कार समारंभप्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.



**कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात बोलताना ज्येष्ठ साहित्यिक डॉ. लक्ष्मीकांत देशमुख. शेजारी डॉ. राजन गवस, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सलीम मुल्ला, डॉ. रणधीर शिंदे व डॉ. नंदकुमार मोरे. (छाया : पप्पू आत्तार)**

डॉ. देशमुख म्हणाले, आजच्या परिस्थितीत मूल्यभान ठेवून, शांतपणे, तटस्थपणे सत्याचा शोध घेणाऱ्या साहित्यिकांची गरज आहे. जागतिकीकरणानंतर आलेली अमानुषता, जगण्यातली विषमता, नव-आर्थिक चातुर्वर्ण्य व्यवस्था, जल, जमीन, जंगल यांच्यासंदर्भातील पर्यावरणीय अनास्था यांचा वेध घेताना व त्यावर प्रहार करताना मानवतावादाचा उद्घोष हे साहित्यिक करतात.

डॉ. राजन गवस म्हणाले, लेखक भ्रष्ट झाला की तो लेखक म्हणून संपतो. त्याच्या लेखनातूनच ते आपोआप जाणवू लागते आणि त्यामुळे त्याचे अस्तित्व नष्ट होण्याच्या मार्गी लागते. लेखक हा नेहमी व्यवस्थेचा विरोधक असतो, असावा कारण व्यवस्थेच्या दोषांवर बोट ठेवणं हेच त्याचे खरे काम असते. त्यामुळे लेखन खूप गांभीर्याने करण्याची बाब आहे.

### साहित्य अकादमी पुरस्कार विजेते

सलीम मुल्ला (जंगल खजिन्याचा शोध - कादंबरी), युवा साहित्य पुरस्कार विजेते सुशीलकुमार शिंदे (शहर आत्महत्या करायचं म्हणतंय- कवितासंग्रह), मराठवाडा साहित्य परिषदेचा बी. रघुनाथ पुरस्कार विजेते किरण गुरव (जुगाड - कादंबरी), परिषदेचा म.भि. चिटणीस पुरस्कार विजेते दत्ता घोलप (मराठी कादंबरी : आशय आणि आविष्कार - समीक्षाग्रंथ) यांचा समावेश होता. मान्यवरांच्या हस्ते शाल, ग्रंथ व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, श्रमिक, शोषित, दलित, वंचित, महिला यांच्या प्रश्नांनी नवे स्वरुप धारण केले आहे. युवा पिढीला त्यांच्यासमोरील प्रश्नांचा वेध घेऊन दिशा दाखविणाऱ्यांची गरज आहे.

यावेळी सर्व सत्कारमूर्तींनी मनोगत व्यक्त केले. मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नंदकुमार मोरे यांनी परिचय करून दिला. यावेळी डॉ. प्रकाश पवार, जयसिंग पाटील आदी उपस्थित होते.